# जाहिरात

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ.जि. ठाणे. या संस्थेकरीता पुढील शैक्षणिक वर्षाकरिता १०० विद्यार्थी क्षमतेचे याप्रमाणे ३ वर्षाकरिता मुला व मुलींचे वसतीगृह (२५० विद्यार्थी क्षमता) वरिष्ठ व कनिष्ठ निवासी (आंतरवासिता विद्यार्थी) (UG/SR/Interns) निवासस्थान वापरासाठी असलेली इमारत शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मूल्यांकनानुसार भाडे तत्वावर घेणे आहे. सदर इमारती भाड्याने घेण्यासाठी खालील अटींची पुर्तता होण्याची आवश्यकता आहे.

१. इमारत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, जि.ठाणे या संस्थेच्या सर्व्हे क्र.१२८ पै. या जागेपासून जवळ असावी तसेच जास्तीत जास्त ६ कि.मी.च्या अंतरावर असलेल्या इमारतींस प्राधान्य दिले जाईल.

२. सदर इमारतीत खोल्यांची (रुम) संख्या (२५० विद्यार्थी क्षमतेप्रमाणे) असावी.

३. सदर इमारतीत किमान २५० विद्यार्थी प्रवेशासाठी वसतिगृह व UG/SR/Interns निवासस्थान इमारत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता करण्या योग्य वसतिगृह/निवासस्थान उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ या संस्थेकरिता शैक्षणिक वर्षाकरिता एकूण २५० विद्यार्थी क्षमतेप्रमाणे ३ वर्षाकरिता मुला-मुलींचे वसतीगृह (२५० विद्यार्थी क्षमता) वरिष्ठ निवासी तसेच कनिष्ठ निवासी (आंतरवासिता विद्यार्थी) (UG/SR/Interns) निवासस्थान वापरासाठी शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकनानुसार भाडेतत्वावर घेणे अत्यंत आवश्यक आहे. तरी इच्छुक मालक व्यक्ती/संस्थांनी मालकी हक्कांची कागदपत्रे, बांधकाम आराखडा, इमारतीचा पत्ता, खोल्यांची संख्या, उपलब्ध सोयी, सुविधा, फर्निचर, प्रांगण, इमारत व इतर कायदेशीर कागदपत्रे तसेच आतील फोटो सहीत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दि.१६.०७.२०२५ या कालावधी पर्यत deangmcambernath@gmail.com या ईमेलवर अर्ज सादर करावा . तसेच या बाबतची आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्तींची यादी संचालनालयाच्या www.med-edu.in व महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.gmcambernath.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.
दि.३०.०७.२०२५ नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही .

सही /-
(डॉ . संतोष जी . वर्मा)
अधिष्ठाता ,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अंबरनाथ.

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, जि. ठाणे-४२१ ५०५
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, AMBERNATH, DIST. THANE - 421 505
e-mail :- deangmcambernath@gmail.com
पत्ता :-सर्व्हे न. १२८, जांभुळगाव रोड, अंबरनाथ (पश्चिम), जि.ठाणे. ४२१ ५०५

जा.क्र.शावैमअं/खाजगी इमारत भाडेतत्वावर/जाहिरात/ ९२८६ /२०२५, दि.११/०७/२०२५

## -: जाहिरात :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ.जि. ठाणे. या संस्थेकरीता पुढील शैक्षणिक वर्षाकरिता १०० विद्यार्थी क्षमतेचे याप्रमाणे ३ वर्षाकरिता मुला व मुलींचे वसतीगृह (२५० विद्यार्थी क्षमता) वरिष्ठ व कनिष्ठ निवासी (आंतरवासिता विद्यार्थी) (UG/SR/Interns) निवासस्थान वापरासाठी असलेली इमारत/इमारती शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मूल्यांकनानुसार भाडे तत्वावर घेणे आहे. सदर इमारत भाड्याने घेण्यासाठी खालील अटींची पुर्तता होण्याची आवश्यकता आहे.

१. इमारत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, जि.ठाणे या संस्थेच्या सर्व्हे क्र.१२८ पै. या जागेपासून जवळ असावी तसेच जास्तीत जास्त ६ कि.मी.च्या अंतरावर असलेल्या इमारतींस प्राधान्य दिले जाईल.
२. सदर इमारतीत खोल्यांची (रुम) संख्या (२५० विद्यार्थी क्षमतेप्रमाणे) असावी.
३. सदर इमारतीत किमान २५० विद्यार्थी प्रवेशासाठी वसतिगृह व UG/SR/Interns निवासस्थान इमारत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता करण्या योग्य वसतिगृह/निवासस्थान उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ या संस्थेकरिता शैक्षणिक वर्षाकरिता एकूण २५० विद्यार्थी क्षमतेप्रमाणे ३ वर्षाकरिता मुला-मुलींचे वसतीगृह (२५० विद्यार्थी क्षमता) वरिष्ठ निवासी तसेच कनिष्ठ निवासी (आंतरवासिता विद्यार्थी) (UG/SR/Interns) निवासस्थान वापरासाठी शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकनानुसार भाडेतत्वावर घेणे अत्यंत आवश्यक आहे. तरी इच्छुक मालक व्यक्ती/संस्थांनी मालकी हक्कांची कागदपत्रे, बांधकाम आराखडा, इमारतीचा पत्ता, खोल्यांची संख्या, उपलब्ध सोयी, सुविधा, फर्निचर, प्रांगण, इमारत व इतर कायदेशीर कागदपत्रे तसेच आतील फोटो सहीत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दि.१६.०७.२०२५ या कालावधी पर्यत deangmcambernath@gmail.com या ईमेलवर अर्ज सादर करावा . तसेच या बाबतची आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्तीची यादी संचालनालयाच्या www.med-edu.in व महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.gmcambernath.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.
दि. ३०.०७.२०२५ नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही .

**सदरील भाडेतत्वावरील जागा उपलब्ध करुन देणेसंबंधी अटी व शर्ती इ. बाबतची माहिती खालीलप्रमाणे**

**अटी व शर्ती :-**

१. सदरील इमारतीमध्ये नियमित पुरेशा प्रमाणात शुध्द पिण्याचे पाणी व वापरण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापन व स्वच्छतागृहे व सुरक्षा रक्षक व्यवस्था, इ. असावे .
२. विद्युत पुरवठ्याची व सिलिंग फॅन्स व विद्युत बल्ब/ट्युबची संपुर्ण व्यवस्था असावी.
३. इमारतींतील विद्युत वायरिंग ही जड विद्युत उपकरण लावण्या योग्य असावी.
४. इमारतीच्या आवारात वाहनांच्या पार्कींगसाठी पुरेशी जागा असावी.
५. इमारत ही ३ मजल्यापेक्षा जास्त असल्यास तेथे उद्वाहनाची सोय आवश्यक असावी.

(पान नं.२ वर पहा)

६. इमारत/इमारती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, जि.ठाणे या संस्थेच्या सर्व्हे क्र १२८. जांभुळगाव रोड, अंबरनाथ (पश्चिम) ठाणे ४२१५०५ या जागेपासून जवळ असलेल्या तसेच जास्तीत जास्त ६ कि.मी.च्या अंतरावर असलेल्या इमारतींस प्राधान्य दिले जाईल.

७. इमारत ३ वर्षे किंवा सदरील संस्थेचे पुढील आदेश होईपर्यत अथवा नवीन इमारत भाड्याने घेई पर्यंत अथवा सदरील संस्थेची संबंधीत नवीन इमारत तयार होईपर्यत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत इमारत भाडे करार तत्वावर घेणे आहे.

८. पाणीपट्टी, घरपट्टी व इतर अनुषंगीक कर भरण्याची जबाबदारी ही इमारत मालकाची राहील.

९. पाणी, विद्युत (शासकीय नियमाप्रमाणे विजेचे डिपोजिट वजा करुन) देयके या संस्थेमार्फत अदा करण्यात येतील.

१०. इमारत ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून ताब्यात असलेल्या खोल्यामधील विद्यूत वापराच्या देयकाची भरणा या संस्थेकडून करण्यांत येईल.

११. इमारतीचे बांधकाम १५ वर्षापेक्षा जुने नसावे.

१२. इमारती संबंधीची आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. (इमारतीचा मंजुर नकाशा, ७/१२ उतारा, बांधकाम पुर्णत्वाचा/भोगवटा दाखला, विद्युत देयक, नगरपालिका कर पावती, इमारतीचे फोटो, इ.)

१३. इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबरनाथ/उल्हासनगर यांनी निर्धारित/निश्चित केल्याप्रमाणे शासकीय नियमानुसार अदा करण्यात येईल.

१४. इमारतीमध्ये किमान २५० विद्यार्थी क्षमता असणे आवश्यक आहे.

१५. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थींच्या सुरक्षेच्या दृष्टीने इमारत पूर्णता सुरक्षित, सर्व खिडक्यांवर तसेच बाल्कनीवर सुरक्षा ग्रिल व मच्छरजाळी, तसेच संरचानात्क, परिरक्षण व विद्युतप्रतिबंधात्मक, अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना केलेली असावी.

१६. इमारतीचे स्थानिक कर अधिक जीएसटी/सोसायटी देखभाल (Maintenance) हे इमारत मालक यांना अदा करावे लागेल.

१७. इमारतीमध्ये सर्व विद्यूत संबधीत व लहान, मोठी दुरुस्तीचे कामे तसेच नुतनीकरण करण्याची जबाबदारी इमारत मालकाची राहील व त्याकरीताचा खर्च इमारत मालकास स्वत: करावा लागेल व त्याची प्रतिपूर्ती या कार्यालयाकडून होणार नाही.

१८. इमारतीचे भाडे शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतरच इमारत मालकास अदा करण्यांत येईल.

१९. संस्थास्तरावर गठीत केलेल्या समितीद्वारे इमारतींची संपुर्ण पाहणी करुन समितीच्या अहवालानुसार इमारत भाडयाने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

२०. सदर इमारती भाडयाने घेण्यासंबंधी सुरक्षा ठेव अदा करण्यात येणार नाही.

२१. इमारत भाडयाने घेण्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा कोणत्याही वेळी पुर्व सुचना न देता आदेश रद्द करण्याचे तसेच जाहिरात रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, जि. ठाणे यांनी राखुन ठेवलेले आहे.

२२. उपरोक्त अटी व शर्ती या शिथिल करण्याचा अधिकार हा मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवला आहे.

(डॉ. संतोष जी. वर्मा)
**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**अंबरनाथ, जि. ठाणे.**